स्थापना 'एकमेका सहाय्य करु अवघे धरु सुपंथ' २८ ऑगस्ट १९८९

१५ वा वार्षिक अहवाल सन २००३-२००४

सर्वमंगलमाङ्गल्ये शिवे सर्वार्थसाधिके । शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणि नमोऽस्तुते ।।

"जनसामान्यांच्या विश्वासाचं प्रतिक"

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या., अंबरनाथ

नोंदणी क्र. टी.एन्.ए./यू.एल.आर./आर.एस.आर.(सी.आर.)/३७४/१९८९-९०

प्रशासकीय कार्यालय : ३०४६, इंदिरा गांधी चौक, महालक्ष्मी नगर, अंबरनाथ (पु.), जि. ठाणे - ४२१५०१.

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ

संचालक-मंडळ

सौ. निलम अ. आंब्रे
उपाध्यक्ष

श्री. जयवंतराव बंडू काटकर
संस्थापक - अध्यक्ष

श्री. शशिकांत मनोहर शिर्के
सचिव

श्री. प्रकाश शं. पवार
खजिनदार

श्री. हणमंत स. घनवट
संचालक

श्री. अविनाश ना. खानविलकर
संचालक

श्री. प्रकाश शं. [illegible]
संचालक

श्री. भगवान अ. ऊतेकर
संचालक

सौ. मंगला श्रीधर ढाले
संचालिका

श्री. मनोहर पां. जाधव
संचालक

श्री. बाबुराव ना. साठे
संचालक

श्री. शंकर जि. शेलवले
संचालक

सौ. प्रिती प्र. नलावडे
संचालिका

श्री. विजय अ. पाटील
(बी.कॉम.जी.डी.सी. ॲण्ड ए)
अंतर्गत हिशोब तपासणीस

श्री. तुकाराम अं. शेडे
अंतर्गत हिशोब तपासणीस

१५ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेची नोटीस

(फक्त सभासदांसाठी)

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ ह्या संस्थेच्या सर्व सभासदांना कळविण्यात येते की, संस्थेची **पंधरावी वार्षिक सर्वसाधारण सभा रविवार, दि. १-८-२००४ रोजी सकाळी ९.३० वा. महात्मा गांधी विद्यालय, अंबरनाथ (प.)** येथे खालील विषयांचा विचार करण्यासाठी आयोजित केली आहे. तरी सर्व सभासदांनी या सभेस उपस्थित राहून सहकार्य करावे, हि विनंती.

सभेपुढील विषय

१) मागील वार्षिक सर्वसाधारण सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.

२) दि. ३१ मार्च २००४ रोजी संपणाऱ्या सहकारी वर्षाचा अहवाल, ताळेबंद व नफा-तोटा पत्रकास मंजूरी देणे.

३) दि. ३१ मार्च २००४ रोजी संपणाऱ्या सहकारी वर्षाच्या नफा विभागणी पत्रकास मंजूरी देणे.

४) सन २००४-२००५ च्या अंदाज पत्रकास मंजूरी देणे.

५) सन २००४-२००५ सालाकरिता अंतर्गत हिशोब तपासणीसांची निवड करणे.

६) पोटनियम दुरुस्तीस मंजूरी देणे. (सोबत उपविधी दुरुस्ती प्रकरण जोडले आहे.)

७) कर्जाच्या थकबाकीवर विचार विनिमय करणे.

८) आयत्यावेळी येणाऱ्या विषयांवर मा. अध्यक्षांच्या परवानगीने चर्चा करणे.

अंबरनाथ.
दिनांक : ७-७-२००४

श्री. शशिकांत मनोहर शिर्के
(सचिव)
श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या., अंबरनाथ
(संचालक मंडळाच्या परवानगीनुसार)

सूचना

१) पुरेशा गणसंख्ये अभावी सभा तहकुब झाल्यास अर्ध्या तासानंतर त्याच दिवशी, त्याच ठिकाणी, त्याच विषयांवर सभा बोलविण्यात येईल. त्यास गणसंख्येचे बंधन राहणार नाही.

२) ज्या सभासदांना कामकाजाविषयी प्रश्न विचारावयाचे असतील अगर सुचना द्यावयाच्या असतील त्यांनी आपल्या सुचना अगर प्रश्न दि. २८-७-२००४ पूर्वी लेखी स्वरुपात संस्थेच्या कार्यालयीन वेळेत कार्यालयात आणून द्यावेत.

३) ज्या सभासदांनी सन २००१-०२ ते २००२-०३ चा लाभांश घेतला नसल्यास घेणे अन्यथा तो राखीव निधीत जमा केला जाईल याची नोंद घ्यावी.

४) सभेस येतांना सभासदांनी आपला अहवाल सोबत आणावा.

१५ वा वार्षिक अहवाल

सन्माननीय सभासद बंधू भगिनींनो,

सप्रेम नमस्कार,

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ या आपल्या संस्थेचा १५ वा अहवाल आपल्या समोर सादर करताना एक गोष्ट प्राकर्षाने जाणवते की, ''सहकार'' हा प्रत्येक व्यक्तीचा एक अविभाज्य घटक व स्थायीभाव आहे. सहकाराशिवाय जग चालत नाही आपण सहकारात जगत आहोत ही जाणीव झाली की पैसा दुय्यम होतो व सेवेला प्राधान्य येते. मी एक सामान्य माणूस असून विविध संस्थांच्या माध्यमातून समाजाची सेवा करण्याची संधी मला प्राप्त झाली आहे. समाजाची सेवा करीत आहे. आज १५ वर्षानंतर मागे वळून पाहताना पतसंस्थेच्या प्रगतशील वाटचालीचा मार्ग पुढील ओळीत उधृत होत आहे.

सभासदांचा विश्वास, ग्राहकांचे सहकार्य
संचालकांचे निर्णय, आणि कर्मचाऱ्यांची तत्परता
याचीच फलश्रुती
''श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ''

सर्वात महत्वाचे म्हणजे, सर्वांना बरोबर घ्यावे, सामुहीक निर्णय-प्रक्रिया व कामातील पारदर्शकता, निस्वार्थ भावनेने केलेले कार्य, आणि पतसंस्थेच्या खर्चावर नियंत्रण ठेवणे हे सूत्र संचालकांनी जाणले व जपले आहे. त्यामुळे व्यक्तीमत्व विकास होऊन पतसंस्थेच्या विकासाच्या दृष्टीने ते एक महत्वाचे पाऊल ठरले आहे. असे मी मानतो, त्याचप्रमाणे काळाची पाऊले ओळखून निर्णय घेतल्यास पतसंस्थेचे अस्तित्व कधीच धोक्यात येणार नाही. सामुहीक जबाबदारीची जाणीव ठेवून संचालक व कर्मचारी सभासदांशी वागतात व संपर्क ठेवून असतात. वसुलीच्या बाबतीत कांही अपवाद असू शकतो हेही मी जाणतो. आर्थिक क्षेत्रामध्ये विशिष्ट ध्येय, हेतू, विश्वासार्हता निर्माण करणे ही सोपी गोष्ट नाही परंतू सभासद हिताचे सामुहीक निर्णय घेऊन ते कार्यवाहीत आणण्याचे काम संचालक मंडळाने केले आहे. आर्थिक क्षेत्रामध्ये सातत्याने चढ-उतार होत आहेत. म्हणूनच या क्षेत्रात काम करताना व्यवसायिक गुणवत्ता, सतत अभ्यास, कौशल्य, प्रामाणिकता व सतर्कता आवश्यक आहे. पतसंस्थेचे संचालक मंडळ विशिष्ट ध्येयवाद घेऊन उदात्ततेच्या प्रेरणेने काम करीत आहे. म्हणूनच पतसंस्थेची कार्यक्षमता विशेष अभिनंदनीय आहे. संस्था प्रगतीपथावर नेत असताना, ती मोठी करत असताना देखील ज्या उद्देशाने या संस्थेचे बीज रोवले ते ध्यानात ठेवून उद्दीष्ट जोपसण्याचे काम संचालक मंडळ करीत आहे. यात शंका नाही. सध्या व्याज दरांमध्येही कमालीची स्पर्धा निर्माण झाली आहे. अशावेळी सर्व सेवा एकाच छताखाली उपलब्ध करुन देऊन ग्राहकांमध्ये आपुलकी, ऋणानुबंध निर्माण केले तरच सहकारी संस्था यशस्वी होत असतात. सध्या सहकारी संस्थांची आर्थिक वाढ १८ ते २० % होत असताना

श्री महालक्ष्मी ना. सह. पतपेढीची आर्थिक उलाढाल ४३% नी वाढली आहे. ही निश्चितच अभिनंदनीय गोष्ट आहे.

सध्याच्या स्पर्धेच्या आणि आधुनिक तंत्रज्ञानाच्या काळात सर्व क्षेत्राची पावले ''वाईड एरिया नेटवर्क'' कडे वळत आहेत. सहकारी संस्थांनी देखील काळाची गरज ओळखून आधुनिक तंत्रज्ञान आत्मसात करणे आवश्यक आहे हे जाणून पतसंस्थेचे अंबरनाथ कार्यालयाचे संगणकीकरण सुरु आहे. येत्या महीन्याभरातच अंबरनाथ कार्यालय संपूर्णतः संगणकीकृत झालेले आपणास अनुभवास येईल. त्यानंतर वर्षभरातच पतसंस्थेची बदलापूर व डोंबिवली शाखा संगणकीकृत करण्यात येणार आहे.

आज सुमारे चार कोटींचे खेळते भांडवल उभे केल्याचे समाधान आम्हास आपण सर्वांनी आमच्यावर टाकलेल्या विश्वासामुळेच मिळवणे शक्य झाले आहे. संस्थेचे सर्व सभासद ठेवीदार खातेदार यांचा संस्थेवरील अढळ विश्वास तसेच सेवाभावी वृत्ती व संस्थेशी बांधीलकी यामुळेच संस्था प्रगतीपथावर आहे. त्यांचा आदर राखून आपल्या सर्वांच्या ऋणात राहूनच हा अहवाल सादर करीत आहे.

आर्थिक वर्ष २००३-०४ आढावा -

सन २००३-०४ या आर्थिक वर्षात सर्व सभासद व ठेवीदार यांच्या भरघोस पाठींब्यावर आणि संचालक मंडळाची दूरदृष्टी, योग्य मार्गदर्शन व उत्कृष्ट नियोजन तसेच कालानुरुप आखलेल्या धोरणांमुळे संस्थेच्या प्रगतीचा आलेख कायम चढता राहीलेला आहे. हे खालील तुलनात्मक आकडेवारीवरुन स्पष्ट होते.

तपशील	२००३ - २००४	२००२ - २००३	% वाढ
भाग भांडवल	४३,९६,०५०.००	३५,८८,०२०.००	२२.०५ %
स्वनिधी	१२,५९,५५५.००	९,६१,९९०.००	३०.९३ %
ठेवी	३,०४,४७,४३१.००	२,०८,५८,५४४.००	४५.९४ %
कर्जे	२,४८,७५,३०६.००	१,८७,३०,७७३.००	३२.८० %
गुंतवणूक	१,०२,६७,४००.००	६०,७७,४००.००	६९.१३ %
एकूण उत्पन्न	४३,८८,५६९.००	२९,९६,३१०.००	४६.४६ %
निव्वळ नफा	६,८५,६३६.१०	५,६३,३०९.५०	२१.७१ %

१) सभा -

अहवाल वर्षात संचालक मंडळाच्या १२ सभा झाल्या असून संचालकांची उपस्थिती उल्लेखनीय होती. या अहवाल सालात दि. ३-८-२००३ रोजी वार्षिक सर्व साधारण सभा झालेली आहे.

२) सभासद -

अहवाल वर्षाअखेर सभासद संख्या १५६५ इतकी आहे.

३) भाग भांडवल -

संस्थेचे अधिकृत भागभांडवल ५० लाखांचे आहे. मागील वर्षाअखेर संस्थेचे रु. ३५,८८,०२०/ इतके भागभांडवल होते. अहवाल वर्षात रु. ९,४०,३६०.०० जमा झाले असून राजीनामा दिलेल्या सभासदांना रु. १,३२,३३०.०० परत केल्याने, वर्षाअखेरीस पतसंस्थेकडे भागभांडवल रु. ४३,९६,०५०.०० जमा आहे.

४) राखीव निधी व इतर निधी -

संस्थेचा स्वनिधी जेवढा जास्त तेवढा संस्थेचा पाया मजबूत असतो. त्यानूसार संस्थेने आपल्या निधीत वाढ केली असून एकूण निधी रु. १२,५९,५५५=०० इतका जमा आहे.

५) ठेवी -

संस्थेच्या असंख्य ठेवीदारांनी पतसंस्थेवर टाकलेल्या विश्वासामुळे अहवाल वर्षात संस्थेच्या ठेवीमध्ये ४६ % नी वाढ होऊन वर्षाअखेरीस एकूण ठेवी रु. ३,०४,४७,४३१.०० इतक्या झाल्या आहेत.

संस्थेच्या विविध ठेवयोजनांमध्ये आपण सामील होऊन आपल्या विकासाबरोबर संस्थेच्या विकासास हातभार लावावा.

ठेवीची विगतवारी पुढीलप्रमाणे -

ठेव योजनांचे नांव	ठेव रुपये
मुदत ठेव	१,१३,७४,७१३.००
दामदुप्पट ठेव	५१,०२,३५८.००
मासिक मिळकत ठेव	४५,९७,०००.००
दैनंदिन ठेव	६६,८२,७४०.००
मासिक ठेव	२१,४८,९२६.००
बालविकास ठेव	७२,९००.००
महिला कुंभबचत ठेव	१६,४६६.००
दिर्घमुदत टेव	२,५००.००
एजंट सुरक्षा ठेव	३९,५६८.००
बचत ठेव	४,१०,२६०.००
एकूण ठेवी	३०४,४७,४३१.००

६) कर्जवाटप -

सहकारी कायदा व पोटनियम यांस सुसंगत असे कर्ज धोरण संचालक मंडळाने स्वीकारले आहे. त्यानुसार लघुउद्योग, छोटे-छोटे व्यापारी यांना जामीनकी कर्जे तसेच विविध प्रकारची तारण कर्जे दिली जातात. सभासदांच्या व ग्राहकांच्या एकूण आर्थिक परीस्थितीचा व कर्जपरत फेडीच्या क्षमतेचा अभ्यास करुन कर्जवाटप केले आहे. संस्थेच्या अर्थिक वर्षात पुढीलप्रमाणे कर्ज वाटप केले आहे.

कर्ज प्रकार	कर्जवाटप रु.
मध्यम मुदत कर्ज	१,२९,६५,८७६.००
दैनंदिन ठेव कर्ज	१४,५३,०७१.००
नाममात्र सभासद कर्ज	३७,६०,९१२.००
वाहन तारण कर्ज	१६,५२,०२५.००
स्थावर जं.मा. तारण कर्ज	६,५२,४११.००
वस्तूखरेदी तारण कर्ज	२,९०,५५१.००
सोनेतारण कर्ज	१४,९९,२३२.००
एन.एस.सी. तारण कर्ज	२,६७,७००.००
गृह तारण कर्ज	२,०५,३११.००
मुदत ठेव तारण कर्ज	२०,१४,१०८.००
व्यवसाय कर्ज	९६,००९.००
मालतारण कर्ज	१८,१००.००
एकूण कर्ज वाटप	२,४८,७५,३०६.००



७) कर्जवसुली -

कोणत्याही यशस्वी वित्तसंस्थेचे मर्म कर्जवसुलीच असते. सन २००२-२००३ अखेर रु. १,८७,३०,७७३/- कर्ज येणे बाकी होते. अहवाल सालात रु. २,४७,३९,१९०/- इतके कर्जवाटप झाले आहे. त्यापैकी रुपये १,८५,९४,६५७/- इतके कर्ज वसुल झाले आहे. अहवाल वर्षअखेर रुपये २,४८,७५,३०६/- इतके कर्ज येणे बाकी आहे. कर्ज थकबाकीची गंभीर दखल संचालक मंडळाने घेऊन कर्जवसुलीचे काम नेटाने मार्गी लावले.

८) ठेवींवरील व्याजाची तरतूद -

ठेवींवरील व्याजाची तरतूद सन २००३-२००४ या अहवाल वर्षात मुदतपूर्ण झालेल्या व या आर्थिक वर्षात जमा झालेल्या परंतू भविष्यात मूदतपूर्ण होणाऱ्या ठेवींसाठी रु. २०,४९,९६०/- व्याजाची तरतूद केली आहे.

९) गुंतवणूक -

संस्थेची आर्थिक स्थिती मजबूत राहण्याच्या दृष्टीने तसेच सहकारी खात्याने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार ठेवी व कर्जे यामध्ये तरलता साधण्याच्या दृष्टीकोनातून या वर्षाअखेर एकूण रुपये १,०२,६७,४०० इतक्या रकमेची गुंतवणूक दि ठाणे जि. मध्य. सह. बँक लि. व अन्य सह. बँकांमधून (शेड्यूल्ड) ठेवीद्वारे केली आहे.

१०) नफा -

सन २००३-२००४ या आर्थिक वर्षात संस्थेला रु. ६,८५,६३६.१०/- इतका नफा झाला आहे. सदर नफ्यातून संचालक मंडळाने कायदेशीर व धोरणात्मक नफा वाटणी सुचविली आहे.

११) शाखा विस्तार -

पतसंस्थेने बदलापूर येथे शाखा उघडून त्याठिकाणी मिळालेल्या उत्स्फूर्त प्रतिसादाने प्रेरीत होऊन संस्थेने दि. ३०.०१.०४ रोजी डोंबिवली येथे आपली दुसरी शाखा कार्यन्वित केली आहे. त्या ठिकाणी मिळालेला भरघोस पाठींबा खालील आकडेवारीवरुन सिद्ध होतो.

शाखा	भाग भांडवल	ठेवी	कर्ज	व्याज वसूल
बदलापूर	३९७७४०.००	७९,९७,६६४.००	९७,५०,८७७.००	११,१०,७३५.००
डोंबिवली (३०.१.०४ ते ३१.०३.०४)	---------	११,३८,१३१.००	१४,०००.००	५०.००

१२) श्रद्धांजली -

अहवाल वर्षात जे सभासद, ठेवीदार, ग्राहक, हितचिंतक, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय किर्तीच्या थोर विभूती पंचतत्वात विलीन झाल्या त्यांच्या स्मृतीस विनम्र अभिवादन.

१३) आभार -

आपल्या पतसंस्थेस वेळोवेळी ज्या ज्या व्यक्तिंनी व संस्थानी सहकार्य दिले त्यांचा ऋणनिर्देश केल्याशिवाय हा अहवाल परीपूर्ण होणार नाही.

मा जिल्हा उपनिबंधक सहसंस्था ठाणे व त्यांच्या कार्यालयातील अधिकारी वर्ग, मा. सहा. निबंधक सह. संस्था उल्हासनगर तालुका, मुंबई / ठाणे जिल्हा सह. बोर्ड लि. चे शिक्षण निधी वसुली अधिकारी श्री. एच. जी. शेटे साहेब, सहकार प्रशिक्षण केंद्र मुंबई चे प्राचार्य श्री. व्हि. व्हि. देसाई, उपप्राचार्य श्री. पी. के. कापडणीस, ठाणे जिल्हा सह. बोर्ड लि. कल्याण चे प्राध्यापक श्री. पानस्कर यांनी वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शन व सहकार्याबद्दल आभार त्याचप्रमाणे मा. दादासाहेब नलावडे माजी नगराध्यक्ष अंबरनाथ नगरपरीषद, मा. श्री. सोनजे सर मुख्याध्यापक महात्मा गांधी विद्यालय, अंबरनाथ, मा. श्री. हरिश्चंद्र (बबन) येरुणकर समाजसेवक व सहकार कार्यकर्ते, पतसंस्थेची संगणक कार्यप्रणाली कार्यान्वित करणारे गुरु कन्सल्टंटचे संचालक श्री. संतोष परुळेकर आणि अधिकारी वर्ग, दि ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक., डोंबिवली ना. सह. बँक, जनकल्याण सह. बँक ठाणे, जयहिंद को. ऑप. बँक, मराठा मंदिर को. ऑप. बँक लि. तसेच अंबरनाथमधील सर्व सह. पतसंस्था यांचे पदाधिकारी व कर्मचारी वर्गाचे सहकार्याबद्दल आभार.

अंतर्गत हिशोबतपासनीस श्री. विजय अ. पाटील व श्री. तुकाराम अं. शेंडे यांनी संस्थेच्या दैनंदिन कामकाजात वेळोवेळी मार्गदर्शन केल्याबद्दल मी खास ऋण व्यक्त करतो.

संस्थेचे कर्मचारी, ठेव प्रतिनिधी यांचा प्रामाणिकपणा व अथक परीश्रमांतून ह्या संस्थेची भरभराट होत असल्याची जाणीव मी येथे खास नमुद करतो. पतसंस्थेचा उत्कर्ष असाच चालू रहावा ही सदिच्छा व्यक्त करुन मी हा अहवाल पूर्ण करतो.

जयहिंद ! जय सहकार !!

आपला
जयवंतराव बंडू काटकर
(अध्यक्ष)
श्री महालक्ष्मी नागरी सह. पतपेढी मर्या. अंबरनाथ

ताळेबंद

रक्कम रु. २००२-०३	जबाबदाऱ्या व देणे		रक्कम रु. २००३-०४
५०,००,०००.००	अधिकृत भाग भांडवल		५०,००,०००.००
३५,८८,०२०.००	वसुल भाग भांडवल		४३,९६,०५०.००
६,०७,३४५.००	**राखीव निधी**	७,४८,१२०.००	
२४०.००	प्रवेश फी	२,४८०.००	
१५,८००.००	नाममात्र सभासद फी	१५,९१०.००	
१४,१८०.००	लाभांश वर्ग	१८,२१२.००	
७०४.००	अनामत ठेव	--------	७,८४,७२२.००
३,५४,६४५.००	**इतर निधी**		
१,९४,६९०.००	इमारत निधी	२,८४,६९०.००	
२६,८१६.००	लाभांश समीकरण निधी	२२,५००.००	
१६,६१५.००	सभासद कल्याण निधी	१८,६१५.००	
६०,३१५.००	संशयीत व बुडीत कर्ज निधी	१,०६,३१५.००	
१४,२१३.००	धर्मदाय निधी	१५,२१३.००	
२३,०००.००	रौप्य महोत्सव निधी	२७,५००.००	
१८,९९६.००	संगणक निधी	--------	४,७४,८३३.००
२,०८,५८,५४४.००	**ठेवी**		
८२,८८,०७५.००	मुदत ठेव	१,१३,७४,७१३.००	
३०,९३,०३३.००	दाम दुप्पट ठेव	५१,०२,३५८.००	
२६,७९,०००.००	मासिक मिळकत ठेव	४५,९७,०००.००	
४९,०३,०१३.००	दैनंदिन ठेव	६६,८२,७४०.००	
१५,४२,९२७.००	मासिक ठेव	२१,४८,९२६.००	
२,६९,१८८.००	बचत ठेव	४,१०,२६०.००	
४०,५०८.००	इतर ठेवी	५८,५३४.००	
४२,८००.००	बालविकास ठेव	७२,९००.००	३,०४,४७,४३१.००
१२,३२,७९४.००	**देणी व तरतुदी**		
१०,२२,०११.००	देणे ठेवीवरील व्याज	२०,४९,९६०.००	
१७,१०२.००	देणे ऑडीट फी	२५,५००.००	
५,०००.००	शिक्षण निधी	५,०००.००	
२६,७०५.००	कर्मचारी बोनस	३३,६२९.००	
२,७०६.००	देणे अनामत	४,१६६.००	
२६,०००.००	देणे भेटवस्तु	-----	
१,३३,२७०.००	देणे लाभांश	७७,१०८.००	२१,९५,३६३.००
५,६३,३०९.५०	**नफा**		
२०७.५०	शिल्लक नफा (सन ०२-०३)	७४४.५०	
५,६३,१०२.००	चालू नफा (सन ०३-०४)	६,८५,६३६.१०	६,८६,३८०.६०
२,७२,०४,६५७.५०			३,८९,८४,७७९.६०

श्री. शशिकांत म. शिर्के
सचिव

श्री. प्रकाश शं. पवार
खजिनदार

पत्रक (३१.३.२००४ अखेर)

रक्कम रु. २००२-०३	संपत्ती व येणे		रक्कम रु. २००३-०४
२,१३,९८४.००	**रोख शिल्लक**		२,४८,४८५.००
१५,२८,७२२.५०	**बँक शिल्लक**		
१,१३,०४७.५०	दि ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि., अंबरनाथ	१,०१,१८२.५०	
----------	दि ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि., बदलापूर	२,२१०.००	
६,६५,१७५.००	अंबरनाथ जयहिंद को-ऑप. बँक लि., अंबरनाथ	१३,५९,१४७.००	
६,३८,४९६.००	अंबरनाथ जयहिंद को-ऑप. बँक लि., बदलापूर	४,४९,६०६.१०	
१,१२,००४.००	डोंबिवली नागरी सह. बँक लि. अंबरनाथ	४२,१६४.००	
----------	मराठा मंदिर को. ऑप. बँक लि. डोंबिवली	१,५१,४५६.००	
----------	जनकल्याण सहकारी बँक लि. ठाणे	५८,०९९.००	२१,६३,८६४.६०
६०,७७,४००.००	**गुंतवणूक**		
१००.००	भाग-दि ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि.	१००.००	
५,८२,३००.००	राखीव निधी-दि ठाणे जिल्हा मध्य. सह. बँक लि.	७,६७,३००.००	
५४,९५,०००.००	मुदत ठेव	९५,००,०००.००	१,०२,६७,४००.००
१,८७,३०,७७३.००	**कर्जे**		
९६,५९,७०३.००	मध्यम मुदत कर्ज	१,२९,६५,८७६.००	
१४,२०,६००.००	दैनंदिन ठेव कर्ज	१४,५३,०७१.००	
९,२९,००१.००	मुदत ठेव तारण कर्ज	२०,१४,१०८.००	
२,४९,३१५.००	राष्ट्रीय बचत रोखे तारण कर्ज	२,६७,७००.००	
१,५६,९२८.००	वस्तू खरेदी तारण कर्ज	२,९०,५५१.००	
८,४८,०११.००	सोने तारण कर्ज	१४,९९,२३२.००	
२९,०००.००	गृह तारण कर्ज	२,०५,३११.००	
९,२५,९९७.००	वाहन तारण कर्ज	१६,५२,०२५.००	
३,०९,६९१.००	स्था. जं. मालमत्ता तारण कर्ज	६,५२,४११.००	
-----------	व्यवसाय कर्ज	९६,००९.००	
४१,७८,८७७.००	नाममात्र सभासद कर्ज	३७,६०,९१२.००	
२३,६५०.००	मालतारण कर्ज	१८,१००.००	२,४८,७५,३०६.००
३,९१,२८४.००	**स्थावर मालमत्ता (इमारत)**		
	मागील शिल्लक	३,९१,२८४.००	
	चालू खरेदी	+ ३,०९,९००.००	
	2.5% झीज	- १७,५३०.००	६,८३,६५४.००
१,४६,६७४.००	**फर्निचर व डेडस्टॉक**		
	मागील शिल्लक	१,४६,६७४.००	
	चालू खरेदि	+ १,७७,६३९.००	
	झीज	- ३२,४३१.००	२,९१,८८२.००
--------	**संगणक प्रणाली**		
	शिल्लक	७३,५१५.००	
	घसारा	- ७,३५२.००	६६,१६३.००
१०,०,०००.००	कार्यालय डिपॉझिट		२,८२,५००.००
३,०००.००	टेलिफोन अनामत		५,०००.००
४,४५०.००	अधेसिव्ह स्टॅम्प		७,०१०.००
३७०.००	वीज अनामत		३७०.००
------	स्टेशनरी साठा		८२,६४५.००
८,०००.००	येणे ॲडव्हान्स		१०,५००.००
२,७२,०४,६५७.५०			३,८९,८४,७७९.६०

निलम अ. आंब्रे
उपाध्यक्ष

श्री. जयवंतराव बं. काटकर
अध्यक्ष

उत्पन्न - खर्च पत्रक

दिनांक : १/४/२००३ ते ३१/३/२००४ अखेर

रक्कम रुपये २००२-०३	खर्च	रक्कम रुपये २००३-०४	रक्कम रुपये २००२-०३	उत्पन्न	रक्कम रुपये २००३-०४
१९,१९९.००	किरकोळ खर्च	२२९००.००	२६,७८,५८७.००	कर्ज व्याज वसूल	३५,७७,८४७.००
१५,०६६.००	प्रवास खर्च	२८६०३.००	३,०५,६७५.००	बँक व्याज (ठेवीवरील)	७,६३,३५५.८०
७,२००.००	संचालक भत्ता	७३००.००	९,१७०.००	नोटीस फी वसूल	३२,८९५.००
२,०९६.००	विमा खाते	२७३६.००	२,८६३.००	सेवाशुल्क	१४,४५७.००
४३,५२३.००	छपाई व लेखन साहित्य	----	१५.००	बँक लाभांश	१५.००
२,२२,५४५.००	कर्मचारी वेतन	२८०२४५.००			
६,०५२.००	जाहिरात खर्च	१३५२८.००			
१४,८५६.५०	टेलिफोन खर्च	२५३४५.००			
३,१९,८००.००	दै. ठेव कमिशन	४४९९६४.००			
१,१६४.००	बँक चार्जेस	६११.७०			
३,९४७.००	ऑफिस मेंटनन्स खर्च	१६०३३.००			
१०,७३०.००	वीज बिल	७६३०.००			
३१,६००.००	कार्यालय भाडे	३३०००.००			
२,०४०.००	वकील फी	२३००.००			
२,६६१.००	पोस्टेज व टेलिग्राम	४६४८.००			
५,०९५.००	दसरा / लक्ष्मीपूजन खर्च	९२८६.००			
२९,३७१.००	सानुग्रह अनुदान	३३३३९.००			
११,६६८.००	वार्षिक सर्वसाधारण सभा खर्च	६०७२.००			
५,०००.००	शिक्षण निधी	५०००.००			
१७,३३७.००	ऑडिट फी	२८००१.००			
१६,२०,८८०.००	देणे ठेवीवरील व्याज	२६३८१५०.००			
९,०००.००	अंतर्गत हि. त. मानधन	९०००.००			
३०००.००	सचिव मानधन	३०००.००			
५,०९५.००	वि/ए गुणगौरव खर्च	----			
१६,२९७.००	फर्निचर घसारा	३२४३१.००			
७,९८५.००	इमारत घसारा	१७५३०.००			
------	संगणक घसारा	७३५२.००			
------	सामाजिक उपक्रम	३९५५.००			
------	सहकार प्रशिक्षण खर्च	४००.००			
------	डोंबिवली शाखा उद्‌घाटन खर्च	१४५७४.००			
५,६३,१०२.००	निव्वळ नफा	६८५६३६.१०			
२९,९६,३१०.००	एकूण	४३,८८,५६९.८०	२९,९६,३१०.००	एकूण	४३,८८,५६९.८०

श्री. शशिकांत म. शिर्के
सचिव

श्री. प्रकाश शं. पवार
खजिनदार

निलम अ. आंब्रे
उपाध्यक्ष

श्री. जयवंतराव बं. काटकर
अध्यक्ष

नफा विभागणी पत्रक

सन २००३ - २००४

अ.क्र.	तपशील		नफा विभागणी रक्कम	एकूण नफा
१	मागील शिल्लक नफा	७४४.५०		
	अधिक चालू वर्षाचा नफा	६,८५,६३६.१०		६,८६,३८०.६०
२	राखीव निधी २५ %		१,७१,४०९.००	
३	लाभांश समीकरण निधी		१५००.००	
४	रौप्य महोत्सव निधी		४५००.००	
५	धर्मदाय निधी		१०००.००	
६	सभासद कल्याण निधी		२०००.००	
७	संशयीत बुडीत कर्ज निधी		२०,०००.००	
८	लाभांश १२% प्रमाणे		४,८५,८०७.००	
९	शिल्लक नफा		१६४.६०	
	एकूण रुपये		६,८६,३८०.६०	६,८६,३८०.६०

श्री. शशिकांत म. शिर्के	श्री. प्रकाश शं. पवार	निलम अ. आंब्रे	श्री. जयवंतराव ब. काटकर
सचिव	खजिनदार	उपाध्यक्ष	अध्यक्ष

अंदाज पत्रक

सन २००४ – २००५

खर्च	रक्कम रुपये	उत्पन्न	रक्कम रुपये
कर्जावरील व्याज वसूल	४५,७०,५००.००	किरकोळ खर्च	२५,०००.००
बँक व्याज	१०,००,०००.००	प्रवास खर्च	३२,०००.००
नोटीस फी	३८,२००.००	संचालक भत्ता	७,५००.००
बँक लाभांश	१५.००	विमा खाते	९,०००.००
		छ. ले. सा.	१,२५,०००.००
		कर्मचारी वेतन	४,३५,०००.००
		जाहीरात खर्च	१०,०००.००
		टेलिफोन खर्च	३०,०००.००
		दै. ठेव कमिशन	५,५०,०००.००
		ऑ. मेंटनंस खर्च	२०,०००.००
		वीज बील	१०,०००.००
		कार्यालय भाडे	४०,०००.००
		वकील फी	२,५००.००
		पोस्टेज	५,०००.००
		दसरा / लक्ष्मीपूजन खर्च	५,०००.००
		सानुग्रह अनुदान	५०,०००.००
		वा. सा. सभाखर्च	६,०००.००
		शिक्षण निधी	५,०००.००
		अं.हि.त. मानधन	९,०००.००
		ऑडीट फी	३०,०००.००
		सचिव मानधन	३,०००.००
		सहकार प्रशिक्षण खर्च	५,०००.००
		मालमत्ता कर	१५,०००.००
		देणे ठेवीवरील व्याज	३३,९७,४१०.००
		अपेक्षित नफा	७,८२,३०५.००
एकूण	५६,०८,७१५.००	एकूण	५६,०८,७१५.००

श्री. शशिकांत म. शिर्के	श्री. प्रकाश शं. पवार	श्री. निलम अ. आंब्रे	श्री. जयवंतराव बं. काटकर
सचिव	खजिनदार	उपाध्यक्ष	अध्यक्ष

पोटनियम	सध्याचा पोटनियम	पोटनियम दुरुस्ती	दुरुस्तीचे कारण
क निधी क १.३ अ.	संस्थेचे अधिकृत भागभांडवल – संस्थेचे अधिकृत भागभांडवल (अंकी) रु. ५०,००,०००/– अक्षरी पन्नास लाख असेल, प्रत्येक भागाची दर्शनी किंमत रु. १००/– राहील. महाराष्ट्र सह. संस्था अधिनियम १९६० कलम २८ मधील तरतुदीस अधिन राहून सभासदास ५०० भाग धारण करता येईल.	संस्थेचे अधिकृत भाग भांडवल – संस्थेचे अधिकृत भाग भांडवल १,००, ००,०००/– अक्षरी एक कोटी असेल प्रत्येक भागाची दर्शनी किंमत रु. १००/– राहील. महाराष्ट्र सह. संस्था अधिनियम १९६० कलम २८ मधील तरतुदीस अधिन राहून सभासदास ५०० भाग धारण करता येईल.	सभासदांना अधिकाधिक भाग धारण करता यावेत आणि संस्थेच्या अधिकृत भागभांडवलाची मर्यादा कायम रहावी म्हणून .....

अंतर्गत लेखा परिक्षकांचा अहवाल

आम्ही श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, अंबरनाथ या संस्थेच्या सोबत जोडलेल्या सन २००३-२००४ च्या तेरीज, उत्पन्न-खर्च पत्रक व ताळेबंदाचे लेखा परिक्षण केले असून अहवाल करतो की,

१) आमच्या लेखा परिक्षणाच्या उद्देशासाठी आमच्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे व विश्वासाप्रमाणे जरुर ती माहिती व खुलासे उपलब्ध करुन दिलेले आहेत.

२) आमच्या मते पुस्तकांच्या तपासणीतून जितपत दृष्टोत्पत्तीस येईल त्यावरुन संस्थेने महाराष्ट्र राज्य सहकारी संस्थाचा १९६० चा कायदा व नियम आणि संस्थेच्या पोटनियमान्वये अपेक्षित असल्याप्रमाणे योग्य ती हिशोबाची पुस्तके ठेवली आहेत.

३) आम्ही तपासलेले तेरीज, उत्पन्न-खर्च पत्रक व ताळेबंद संस्थेच्या हिशोबाच्या पुस्तकांशी व विवरण पत्रांशी जुळत आहेत.

४) आमच्या मते आमच्या संपूर्ण माहितीप्रमाणे तसेच आम्हाला देण्यात आलेल्या खुलाशावरुन हे हिशोब महाराष्ट्र सहकारी संस्थांचा सन १९६० चा कायदा व त्याखालील नियमान्वये अपेक्षित अशा रितीने आवश्यक अशी माहिती देतात.

स्थळ : अंबरनाथ
दिनांक : १ मे २००४

अंतर्गत हिशोब तपासणीस

श्री. विजय अमृत पाटील
बी. कॉम., जी.डी.सी. ॲण्ड ए.

श्री. तुकाराम अंबाजी शेंडे

शासकीय लेखा परिक्षकांचा अहवाल

(महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा कलम ८१ (५ ब)
आणि महाराष्ट्र सहकारी संस्थाचा नियम १९६९ अन्वये द्यावयचा)

मी श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, अंबरनाथ या संस्थेच्या सोबत जोडलेला ३१-३-२००३ या दिनांकाचा ताळेबंद व सन २००२-२००३ या सहाकरी वर्षाचे नफा/तोटा पत्र तसापले असून अहवाल करीतो की,

१) माझ्या लेखापरिक्षणाच्या उद्देशासाठी माझ्या संपूर्ण ज्ञानाप्रमाणे, माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे खालील प्रमाणे जरुर ती सर्व माहिती व खुलासे उपलब्ध झाले आहेत.

२) माझ्या मते व मला मिळालेल्या माहिती व खुलाशाचे आधारे
(अ) ताळेबंद व नफा / तोटा संस्थेने ठेवलेल्या हिशोबी पुस्तकाशी जुळते असून सदर ३१.३.२००३ या दिनांकाचा ताळेबंद संस्थेच्या व्यवहाराची (कामकाजाची) सत्य व वास्तव स्थिती दर्शवितो आणि नफा-तोटा पत्रकाचे बाबतीत त्या दिनांकास संपणाऱ्या वर्षातील नफ्याचे/तोट्याची सत्य व वास्तव स्थिती दर्शवितो.

३) माझ्या मते संस्थेने महाराष्ट्र सहकारी संस्थाचा कायदा, नियम व संस्थेचे पोटनियम यानुसार आवश्यक असणारी हिशोबी पुस्तके योग्य त्या रितीने ठेवलेली आहेत.

४) सन २००२-२००३ या सहकारी वर्षासाठी संस्थेस लेखापरिक्षण वर्ग **'अ'** देण्यात आला आहे.

सही/-
श्री. सु. श्री. वैशंपायन
लेखापरिक्षक,
सहकारी संस्था, उल्हासनगर.

स्थळ : अंबरनाथ
दिनांक : १६-०८-२००३

सभासदांसाठी सूचना :

१) आपला पत्ता बदलला असल्यास नविन पत्ता पूर्ण तपशीलासह संस्थेस कळवावा.
२) आपल्या वारसदारांची नोंद संस्थेच्या कार्यालयात वेळीच करून घेण्यात यावी.
३) आपला शिल्लक लाभांश संस्थेच्या कार्यालयातून घेऊन जावा.
४) आपली बचत, दैनंदिन,आवर्त,मुदत ठेव, खाती संस्थेत उघडून सहकार्य करावे.
५) आपल्या कर्जाची थकबाकी होणार नाही यांची काळजी घ्यावी.
६) वार्षिक सर्वसाधारण सभेत सभासदांच्या १० वी १२ वी व पदवी परिक्षा प्रथम प्रयत्नात पास झालेल्या मुलांचा सत्कार आयोजित केला आहे. त्यासाठी अशा विद्यार्थ्यांची नावे संस्थेच्या कार्यालयात त्यांच्या प्रणाम पत्राच्या प्रतीसह दि.३०.७.०४ पुर्वी नोंदणे आवश्यक आहे.
७) दर सोमवारी संस्थेचे कार्यालय बंद राहील.
८) एखाद्या महिन्यात जर कार्यालयीन रजा १५ तारखेस असेल तर त्या महिन्याची १६ तारीख ही हप्ता भरण्याची अखेरची तारीख असेल.

हार्दिक शुभेच्छा

✲ दैनंदिन / मासिक ठेव प्रतिनिधी ✲

अंबरनाथ शाखा :

श्री.निलेश नारायण दळवी	
सौ.निवेदिता विलास शिंदे	
श्री.हरिष देवजी चिकणे	
सौ. माधुरी मनोहर जाधव	✆ : २६८५०९४
श्री.बापूराव भिमराव मेश्राम	मो. : ९८२२५१०३२२
श्री.युवराज नागराज जैन	
श्री.बाळू रामदास पाटील	✆ : २६०७७०५
सौ. सुष्मा हरिश्चंद्र येरूणकर	✆ : २६०१५९५
कु. योगिता सहदेव कडू	मो. : ९४२२०७८२५८
श्री.अजित अशोक मांढरे	
श्री. कोमलसिंग पाटील	
सौ.संजीवनी गणेश भारंबे	✆ : २६०३९६२
श्री. विश्वास तुकाराम शेंडे	
सौ. सुनंदा चंद्रशेखर बिराजदार	
श्री. सुनिल भागोजी सावंत	
श्री. मिनाक्षी अशोक थोरात	

बदलापूर शाखा :

सौ.स्नेहल जगदीश मोरे	✆ : २६९०९१७
सौ.गितांजली जयवंत पाटील	
श्री.मलखन नथू पवार	
श्री.विरेंद्र बबन जगदाळे	मो. : ९८५०१७०९५७
सौ. स्वाती कैलास पाटील	✆ : २६७३३६५
श्री. शिवप्रसाद गुप्ता	✆ : ३३९९०३१८
सौ. ज्योती प्रकाश देशमुख	
सौ.सविता दिपक हातोळकर	✆ : २६९३३१०

डोंबिवली शाखा :

सौ. रजनी आ. धायगुडे	
श्री. विलास शांताराम बेलोसे	मो. ९८२१६७०२४८ नि. २४०७०४०
सौ. मनिषा बाळू म्हात्रे	✆ C/o. : २८७२६७०
सौ. मिनाक्षी महेश कुलकर्णी	✆ C/o. : २४०३४७६
श्री. रघुनाथ धोंडू चौगुले	✆ C/o. : २४००८८०, २४०४८०३
श्री. संदिप सहदेव गोसावी	✆ : २४९७१३८
श्री. प्रकाश जगन्नाथ सुर्वे	
श्री. हनुमंत रामचंद्र शेलार	✆ : २४२३२१२
सौ. उषा भास्कर दाबके	✆ : ५३६१४४६
सौ. श्रद्धा विश्वास शिंदे	

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ

* बँकर्स *

- दि ठाणे जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि., अंबरनाथ, बदलापूर
- डोंबिवली नागरी सहकारी बँक लि., अंबरनाथ
- अंबरनाथ जयहिंद को. ऑप. बँक लि., अंबरनाथ, बदलापूर
- जनकल्याण को. ऑप. बँक लि., ठाणे
- मराठा मंदिर को. ऑप. बँक लि., डोंबिवली

कायदेशीर सल्लागार : सागर आर. आगरकर B.Com., LL.B. (Advocate High Court)

* कर्मचारी *

श्री.सुनिल हणमंत घनवट
श्री.नाथा बाबुराव लोटके
श्री.पाडुरंग श्रीपती पाटील
श्री. सुबोध कृष्णा भोसले
कु. संयोगिता अनंत आंबरे
श्री. अमोल सुरेश शिर्के
श्री.आनंदा विठठल पाटील G.D.C. & A.
कु.निलिमा सूर्यकांत दिवाकर
श्री.विनोद दादाजीराव कदम
कु. अनिता वसंत पवार
श्री.संतोष श्रीपती पाटील
श्री. ज्ञानदेव नामदेव पाटील

* कार्यालयीन वेळ *

अंबरनाथ कार्यालय	: मंगळवार ते रविवार	सकाळी ८.३० ते ११.०० व संध्या. ५ ते ७.३० वा.
बदलापूर शाखा	: मंगळवार ते रविवार	स. १०.३० ते १.३० व संध्या. ४.३० ते ७.३० वा.
डोंबिवली शाखा	: मंगळवार ते रविवार	स. १०.३० ते १.३० व संध्या. ४.३० ते ७.३० वा.

* प्रगतीचा दृष्टीक्षेप *



श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्या. अंबरनाथ

आकर्षक ठेव योजना !

दामदुप्पट ठेव - ८७ महिने (७ वर्षे ३ महिने)

महालक्ष्मी मुदत ठेव

४५ दिवस ते १८० दिवस	-	०६.०० %
१८१ दिवस ते ३६४ दिवस	-	०८.०० %
१ वर्षापेक्षा जास्त ते २ वर्षे	-	१०.०० %
२ वर्षापेक्षा जास्त ते ३ वर्षे	-	०९.५० %
३ वर्षापेक्षा जास्त ते ५ वर्षे	-	०९.०० %

महालक्ष्मी मासिक मिळकत ठेव

१ वर्ष	-	०९.०० %
२ वर्ष	-	०९.५० %
३ वर्ष	-	१०.०० %

महालक्ष्मी मासिक ठेव

१ वर्ष	-	०७.५० %
२ वर्ष	-	०८.०० %
३ वर्ष	-	०८.५० %

महालक्ष्मी जनविकास ठेव

१ वर्ष	-	०९.०० %
२ वर्ष	-	०९.५० %
३ वर्ष	-	१०.०० %

महालक्ष्मी बाल विकास ठेव

६१ महिने	-	०९.०० %
७३ महिने	-	०९.५० %
७ वर्षे	-	१०.०० %
८ वर्षे	-	११.०० %
९ वर्षे	-	११.५० %
१० वर्षे	-	१२.०० %

दैनंदिन ठेव : १ वर्ष - ५ % ६ महिने - ४ %

प्रति -

श्री./सौ. ______________________

____

____

प्रेषक -

श्री महालक्ष्मी नागरी सहकारी पतपेढी मर्यादित, अंबरनाथ

३०४६, इंदिरा गांधी चौक, महालक्ष्मी नगर, अंबरनाथ (पु.), जि. ठाणे - ४२१ ५०१.

फोन : अंबरनाथ - २६०९७९०, बदलापूर - २६७१४१९, डोंबिवली - ५६२७०९९.